**अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी ई-गव्हर्नन्स च्या उद्दिष्टांचा समावेश कार्यमुल्यांकन अहवाल (PAR) मध्ये करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र.मातंस/प्र.क्र.०९/३९,**
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १० फेब्रुवारी, २०१०.**

**प्रस्तावना**

शासनामार्फत जनतेस पुरविल्या जाणा-या सेवा-सुविधा जलद गतीने, वाजवी दरात, नजीकच्या ठिकाणी व एकत्रितरीत्या देणे हे उत्तम प्रशासनाचे द्योतक आहे. माहिती तंत्रज्ञान अर्थात इंटरनेटच्या माध्यमातुन अशा सेवा अत्यंत वेगाने व स्वस्त दरात देता येतात हे ऑनलाईन रेल्वे आरक्षण, इंटरनेट बँकींग, ऑनलाईन आयकर परतावे इ. उदाहरणांमधून सिध्द झाले आहे. राज्य शासनाच्या काही विभागांमधूनही असे प्रयत्न केले जात आहेत. उदा. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, विक्रीकर विवरणपत्रांचे ई-फाईलिंग, दुय्यम निबंधक कार्यालयातून दस्ताऐवजांची संगणकीकृत नोंदणी, सेतु, महा-ई-सेवा केंद्र इत्यादी माध्यमातुन देण्यात येणारी विविध प्रमाणपत्रे / दाखले, मंत्रालयातील कर्मचा-यांच्या उपस्थितीची बायोमॅट्रिक पध्दतीने नोंदणी इत्यादी सेवा माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेस देणे शासनास भविष्यकाळात अनिवार्य ठरणार आहे.

२. इंटरनेटद्वारे जनतेस देण्यात येणाऱ्या शासकीय सेवा व सदर सेवा पुरविण्यासाठी आवश्यक पायाभुत सोयींची उपलब्धता यांचा साकल्याने विचार करुन विविध सेवांचा समावेश असलेला कृती आराखडा प्रत्येक विभागाने तयार करणे आवश्यक आहे. सदर प्रक्रीयेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांवर आहे. त्यामुळे त्यांच्या वार्षिक कार्यमुल्यांकन अहवालामध्ये (PAR) ई-गव्हर्नन्सचे उद्दिष्ट समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

१. प्रस्तावनेतील उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी, शासनाच्या प्रत्येक विभागाने व त्या अंतर्गत कार्यालयांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्यामार्फत जनतेस दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन वेगाने, सुलभतेने व एकत्रिकृत पध्दतीने व शक्यतो जनतेला जवळच्या ठिकाणावरुन देण्यासाठी तातडीने कृती कार्यक्रम आखावा. त्यासाठी दीर्घकालीन व तातडीच्या अशा दोन्ही प्रकारच्या ऑनलाईन सेवा देण्यासाठीची उद्दीष्टे प्रत्येक विभागाने निश्चित करावीत.

२. निश्चित केलेला कृती कार्यक्रम प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविला जाईल याच्या सुनिश्चितीसाठी अखिल भारतीय सेवेतील कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख व मंत्रालयीन विभागांचे सचिव अशा वरिष्ठ अधिका-यांच्या कार्यमुल्यांकन अहवालामध्ये,(PAR मध्ये) ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी

या बाबीचा समावेश करण्यात यावा. प्रतिवेदन अधिकाऱ्यानी आपल्या अधिपत्याखालील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या PAR मधील वार्षिक कृती आराखडयामध्ये ई-गव्हर्नन्सच्या उद्दिष्टांचा समावेश केला जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच या अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यांकन अहवालाचे प्रतिवेदन करताना या उद्दिष्टाच्या साध्याबाबत (Achievement) विनिर्दिष्टपणे मूल्यमापन व नोंद करावी.

३. सर्व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रतिवेदन अधिकाऱ्यांच्या संमत्तीने त्यांच्या PAR मध्ये समाविष्ट करण्यात येणारे ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाचे उद्दिष्ट दरवर्षी दि. ३० एप्रिल पर्यंत सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये भरुन त्यांच्या प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे पाठवावे व एक प्रत प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान यांना पाठवावी.

४. या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्यांचा संगणक संकेताक २०१००२१०१५३४३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(जे. पी डांगे)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मुख्य सचिव यांचे सचिव,
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८) प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२) सर्व पोलीस आयुक्त,
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी,
१६) सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय, प्रमुख,
१८) महासंचालक, यशदा, पुणे,
१९) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२०) निवड नस्ती. (२ प्रती).

## परिशिष्ट-अ

**(अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांकरिता)**

**नागरिकांना केंद्रस्थानी धरुन माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दयावयाच्या सेवाबाबतचा वार्षिक कृती आराखडा**

**प्रतिवेदन वर्ष:-**

| अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व वर्गश्रेणी (Cadre) | नागरिकांना केंद्रस्थानी धरुन माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रतिवेदन वर्षामध्ये दयावयाच्या ऑनलाईन सेवा | प्रतिवेदन वर्षाच्या अखेरीस साध्य करावयाची उद्दिष्टे | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**( अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांची सही व तारीख)**

प्रत:
१. प्रतिवेदन अधिकारी
२. पुनर्विलोकन अधिकारी
३. मुख्यसचिव
४. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान)